# राजर्षि शाहू महाराज :

## सामाजिक सुधारणा व सद्य:स्थिती

(इतिहास)




: संपादक :

प्रा.डॉ.बी.के.शेप

: मुख्य संपादक :

प्राचार्य, डॉ.आर.के.इप्पर

ISBN 978-93-5240-491-1

# ५२. शाहू महाराजांच्या विचारातील शेती व उद्योगधंदे म्हणजे आर्थिक क्रांती

प्रा.डॉ.वसंत व्यंकटराव कदम
इतिहास विभाग प्रमुख
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर ता.हिमायतनगर, जि. नांदेड

**प्रस्तावना :-** महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासात ज्या-ज्या महान विभूती होऊन गेल्या त्या महान विभुतिमध्ये राजर्षी शाहू महाराजांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते महाराष्ट्रातील बहुजन, शेतकरी कष्टकरी समाजाचा सामाजिक शैक्षणिक व आर्थिक उद्धारासाठी कोणतीही तडजोड न करता आयुष्याच्या अखेर पर्यंत झटणारा सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरुष स्वतःच्या आपल्या मृत्यु पाहणारा . सामाजिक न्याय व सामाजिक लोकशाहीचा आधारस्तंभ आधुनिक महाराष्ट्रातील लोककल्याणकारी राजा ज्यांच्या विचारातून शेती व उद्योगधंद्यात आमुलाग्र बदल घडून आला. आर्थिक क्षेत्रात क्रांती घडुन आली असा श्वेतक्रांती व हरित क्रांतीचा अग्रदूत 'राजामधील थोर माणूस व माणसांमधील थोर राजा ' म्हणजेच लोकराजा राजर्षी शाहू महाराज होत.

मध्ययुगीन कालखंडात आपला देश कृषीप्रधान देश होता. आज आधुनिक कालखंडात लहान मोठ्या उद्योगधंद्याचा बऱ्यापैकी विकास होऊनही कृषिप्रधानच मानला जातो याचे महत्वाचे कारण म्हणजे आज देखील बहुसंख्य लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. म्हणून शेती हा भारताच्या अर्थव्यवस्थेचा प्रमुख भाग आहे. त्यामुळे शेतीचा विकास म्हणजेच शेतकऱ्याचा विकास पर्यायाने राष्ट्राचा विकास हेच सूत्र काळाचेही पाऊले ओळखणाऱ्या शाहू महाराजांनी जाणले आणि आपल्या संस्थानात सामाजिक आणि शैक्षणिक सुधारणे बरोबरच आर्थिक क्षेत्रात क्रांती करण्यासाठी, परंपारिक शेती व्यवसायात सुधारणा करण्याचे कार्य हाती घेतले तसेच शेतीला जोड धंदा म्हणून नवनविन उद्योग धंदे सुरु केले. तसेच उद्योगधंद्यांना सहकाराची जोड दिली. त्यामुळे आर्थिक क्षेत्रात क्रांतीकारी बदल घडून आला . एकुणच शाहू महाराजांनी आर्थिक क्षेत्रात क्रांतीचा पाया रचुन महाराष्ट्रात शेती व उद्योगधंद्याच्या विकासाचीच्या प्रगतीची मुहूर्तमेढ रोवली. प्रस्तुत शोध निबंधात राजर्षी शाहू महाराजांच्या विचारातील शेती व उद्योगधंदे म्हणजेच आर्थिक क्रांती या विषयाचा अभ्यास केलेला आहे.

**शेती विषयक धोरण :-** राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूरच्या राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांनी पहिल्या प्रथम संस्थानातील समाजजिवनाचे अत्यंत बारकाईने आणि सुक्ष्मपणे निरीक्षण केले. त्यातून त्यांच्या असे लक्षात आले की, शैक्षणिक अज्ञान आणि आर्थिक दारिद्र्य हे बहुसंख्यांक शेतकरी यांचे दोन मोठे शत्रू आहेत. अज्ञानातून आलेले सामाजिक मागासलेपणा व दारिद्र्यातून आलेले भौतिक मागासलेपण अशा दुहेरी कैचीत बहुजनीय शेतकरी सापडलेला आहे. त्यातच दुष्काळासारखे संकट वारंवार कोसळल्यामुळे सर्वसामान्यांचे

ISBN 978-93-5240-091-1

जीवन उध्वस्त होत होते. त्यांची परिस्थिती अत्यंत हालाकिची बनत चालली होती. हे महाराजांनी जानले याच कालावधित इ.स. १९०२ मध्ये युरोपचा प्रवास केला युरोपीयन लोकांनी केलेल्या भौतिक प्रगतीने ते प्रभावित झाले युरोपातील जलसिंचन त्यांनी पाहिले जागोजागी नद्यांवरील धरणे पाहुन आपल्या देशात असे धरणे आपण का निर्माण करू शकत नाही. असा विचार त्यांच्या मनात आला. मनातील विचार त्यांनी कृतीत उतरवला याच वर्षी शेतीला कायमस्वरूपी पाणी पुरवठा करण्यासाठी आणि वारंवार पडणाऱ्या दुष्काळावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी पायाभुत स्वरूपाची योजना तयार केली आणि 'सर्वात्रिक पाठबांधारे धोरण' जाहीर केले याच्य नियंत्रन ठेवण्यासाठी Irrigation officer ची नेमणूक करून या विभागात मार्फत राज्यातीलप्रत्येक वाडी व गावाची पाटबंधाऱ्यांच्या दृष्टीने पाहणी केली नव्या, जुन्या विहीरी, कालवे, लहान मोठे तलाव, बधांरे यांची नोंद करून प्रथम त्यांच्या दुरूस्तिचे काम हाती घेतले. नविन विहिरी, नव तलाव व छोटे छोटे बंधारे अशा योजना तातडीने हाती घेतल्या. पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब आणि स्त्रोत अडविण्याचा प्रयत्न सुरू झाला. तसेच शेतीला निश्चित व कायमस्वरूपी पाणी पुरवठा व्हावा यासाठी इ.स.१९०९ मध्ये कोल्हापुरच्या पश्चिमेस ५५ कि.मी अंतरावर दाजिपुर नजीक भोगावती नदीवर महाराणी लक्ष्मिबाई नावाने धरण बांधले. आज हे धरण 'राधानगरी धरण' या नावाने ओळखले जाते. या धरणामुळे दरवर्षी ६०० दशलक्ष घनफुट पाणी शेतीसाठी उपलब्ध होऊ लागले. शेतीला कायम पाणी पुरवठा होणारी भव्य योजना माहाराजानी आणली महाराज एका ठिकानी म्हणतात. हा प्रकल्प सिध्दीस गेल्यास माझे जीवीतकार्यच पूर्ण होईल. या प्रकल्पामुळे महाराजांचे स्वप्न साकार झाले. राज्यात बारमाही हिरवीगार शेती फुलू लागली आणिा हरित क्रांतीस प्रारंभ झाला.

**उद्योगधंद्या संबंधी धोरण :** आपला देश कृषिप्रधान आहे बहुसंख्यांक लोकांची उपजिविका शेतीवर अवलंबुन आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन शेती करावी, परंतु जनतेनी केवळ शेतीवर अवलंबुन न राहता व्यापार व उद्योग धंदयाच्या क्षेत्रात प्रवेश केला पाहीजे. आधुनिक काळात देशाची खरी प्रगती ही व्यापार व उद्योगधंदयावर तसेच निर्यात होणाऱ्या उत्पादनावर अवलंबुन असल्याचे मत शाहू महाराजानी व्यक्त केले. व्यापार व उद्योग करण्याचे धाडस आम्ही केले नाही, तर राष्ट्राचा विकासच होणार नाही आपले सर्व कार्य निरर्थक होईल. बोले तैसा चाले त्यांची वंदावी पावले या उक्ती प्रमाणे राजानी आपल्या दोन्ही राजपुत्राना शेती, व्यापार व उद्योग धंद्यात घेतले. हरितक्रांती मुळे आणि उसउत्पादकांना प्रोत्साहन दिल्यामुळे कोल्हापुरात गुळाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले. परंतु गुळाची बाजारपेठ कोकनातील राजापुर येते होती, त्यामुळे तो राजापुरी गुळ म्हणून विकला जाई गुळ कोल्हापुरचा आणि नाव मात्र राजापुरचे ही परिस्थिती महाराजांनी बदलुन कोल्हापुरातील शाहूपुरी ही नवी बाजारपेठ वसवीली. संस्थानातील शेतीमालास संस्थानातच बाजारपेठ मिळवून दिली. आज सर्व देशात कोल्हापुर ही गुळाची सर्वात मोठी बाजार पेठ मानली जाते.

प्रत्येक क्षेत्रातील प्रगती ही नियोजनबद्ध असायला हवी असे महाराजांना वाटत होते म्हणुनच त्यांनी आपल्या प्रांतातील उपलब्ध साधन सामुग्रीचे सर्वेक्षण करुन नवनविन उद्योगधंदे

ISBN 978-93-5240-091-1

सुरु केले. लोकांना लहान मोठे उद्योग सुरुकरण्यासाठी अर्थसाहय व प्रोत्साहन दिले एवढेच नाही तर विविध उद्योगधंदयांचे प्रशिक्षण घेण्यासाठी आपल्या मानसांना बाहेर पाठविले तर काही प्रशिक्षकांना येथेच निमंत्रित केले. महाराजांनी त्या काळात उद्योगधंदे सुरु करण्यासाठी दाखविलेली प्रयोगशिलता अनेकांना अचंबीत करणारी ठरली. सुगंधीत औषधी तेल, मधुमक्षिकापालन उद्योग, कुष्ठार्क उद्योग तसेच सुती कापड उद्योग हे महाराजांचे कौतुकास्पद उपक्रम ठरले.

इ.स. १९०६ मध्ये महाराजांनी 'शाहू छत्रपती मिल्स' या कापड गिरणी उद्योगाची स्थापना केली. कोल्हापूर संस्थानात उद्योगधंद्याच्या क्षेत्रातील हा सर्वात मोठा प्रकल्प होता. महाराजांनी सुरु केलेल्या उद्योगामुळे राज्यातील हजारो लोकांना रोजगार उपलब्ध झाला. याच कालावधीत संस्थानातील शिरोळा, इचलकरंजी गडहिग्लंज इत्यादी ठिकाणी अनेक जिनिंग फॅक्ट्रीज स्थापन केल्या गेल्या त्या बररोबरच इ.स. १९१२-१३ च्या सुमारांस संस्थानातील पहिली ऑईल मिल, पहिली सॉ मिल, पहिली फाउंड्री फॅक्टरी, पहिली इलेक्ट्रिक कंपनी, पहिली मोटार ट्रान्सपोर्ट कंपनी असे अनेक उद्योग सुरु केले, विविध उद्योगासाठी प्रशिक्षित कामगार तयार व्हावेत म्हणुन 'राजाराम इंडस्ट्रियल स्कुल' स्थापन करण्यात आली. इ.स. १९१३ मध्ये महाराजांनी 'कोल्हापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटी ली.' ही पहिली सहाकरी संस्था स्थापन करुन सहकारचळवळीला चालाना दिली. यामुळे आज शेती व्यापार व उद्योग व्यवसायात कोल्हापुर जिल्हा हरितक्रांतीत व श्वेतक्रांतीत अग्रेसर आहे. विशेषत: महाराष्ट्रातील विदर्भ- मराठवाड्यात कापुस उत्पादीत होतो तर कापसापासुन सुत उत्पादीत करणाऱ्या सर्व आदर्श व कार्यक्षम ठरलेल्या सुतगिरण्या कोल्हापूर आणि परिसरामध्ये आहेत येथुन परदेशात मोठी निर्यात केली. जाते थोडक्यात असे म्हणता येईल की शेती, व्यापार व उद्योग क्षेत्रात जी प्रगती झाली या प्रगतीचा पाया खऱ्या अर्थाने महाराजांनीच रचला.

**संदर्भ सुची :**


१) पवार जयसिंगराव, 'राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य' महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर - इ.स. २०१२

२) जाधव भ. बा. 'राजर्षी शाहू महाराजांची भाषणे' शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर. इ. स. २००१

३) डॉ. मोरे गिरीश, राजर्षी शाहू विचार व कार्य निर्मिती विचारमंच कोल्हापूर.

४) डॉ. गाढाळ साहेबराव 'आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास' कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद जून २००५.

५) डॉ. कठारे अनिल, 'फुले-शाहू-लोकहितवादी' पूनम प्रकाशन, कंधार - २००७

६) घोटी अमरदीप, 'महाराष्ट्रातील समाज सुधारक' वर्षा पब्लिकेशन नांदेड.


❖❖❖